Corporate Communications & Investor Relations

TELE: 020-25614495, 25614366,

# बँक ऑफ महाराष्ट्रचा 89 वा स्थापना दिवस साजरा , अनेक अत्याधुनिक बँकिंग योजना व सेवांचे उद्घाटन

पुणे 17 सप्टेंबर 2023 : देशातील एक प्रमुख सार्वजनिक क्षेत्रातील बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रचा (BoM), 89 वा स्थापना दिवस दिनांक 16 सप्टेंबर 2023 रोजी पुण्यात साजरा केला. बँकेचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव, कार्यकारी संचालक, श्री ए बी विजयकुमार, श्री आशीष पांडे, यांच्यासह कार्यक्रमाला बँकेचे सरव्यवस्थापक व इतर अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाला बँकेचे पुणे शहर, पश्चिम आणि पूर्व विभागाचे विभागीय व्यवस्थापक त्यांच्या चमूसह उपस्थित होते. हॉटेल ग्रँड शेरेटन येथील मुख्य कार्यक्रमाला बँकेचे सुमारे 450 ग्राहक उपस्थित होते.

बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव यांनी कार्यक्रमात आपल्या भाषणादरम्यान,बँकेच्या दृष्ट्या संस्थापकांना आदरांजली वाहिली आणि भागधारक आणि ग्राहकांचे आभार मानले. त्यांनी बँकेच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आणि आपल्या खऱ्या क्षमतेचा आणि बँकिंगच्या पुढच्या टप्प्यात विविध उपक्रम राबविण्यासाठी बँकेसमोरील या निर्णायक क्षणाचे महत्व त्यांनी अधोरेखित केले. बँकेच्या व्यावसायिक क्षितिजाचा विस्तार करण्यासाठी त्यांनी डिजिटलायझेशन आणि आधुनिक बँकिंगचे महत्त्व अधोरेखित केले.

श्री राजीव म्हणाले, “भूतकाळातील आव्हानांनी आम्हाला मजबूत आणि लवचिक बनवले आहे. बँकिंग क्षेत्र एका महत्वपूर्ण बदलातून जात आहे आणि बँक ऑफ महाराष्ट्र पुढील पिढीच्या बँकिंगसाठी विकसित होत असलेल्या तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने आधुनिक बँकिंग वैशिष्ट्ये आत्मसात करण्यास सज्ज आहे. मालमत्तेच्या गुणवत्तेची शाश्वत वाढ सुरू राहण्यासाठी बँकेकडे उभयरोधी भांडवल पर्याप्त प्रमाणात उपलब्ध आहे व तिथे बँक चांगल्या स्थितीत आहे. भविष्यातही आपल्या भागधारकांना उत्तरोत्तर समृद्ध करण्यासाठी बँक खात्रीशीर कामगिरीसह सर्व उपाययोजना करत असल्याचेदेखील त्यांनी सांगितले.

आपल्या भाषणात, कार्यकारी संचालक,श्री ए बी विजयकुमार, यांनी बँकिंगचा समाजाच्या उन्नतीसाठी आणि आर्थिक सर्वसमावेशकतेसाठी एक साधन म्हणून वापर करण्याप्रती बँक ऑफ महाराष्ट्रच्या कायमस्वरूपी वचनबद्धतेवर भर दिला आणि समाजातील वंचित आणि उपेक्षित घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी बँकेला प्राप्त झालेले यश अधोरेखित केले. त्यांनी सामाजिक समावेशाच्या परिवर्तनीय क्षमतेवर भर दिला आणि बँक आर्थिक सामर्थ्याचे प्रतीक आणि सर्वांसाठी आशेचा किरण असेल अशा भविष्याची कल्पना करत सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी सातत्याने सहयोग साधण्याचे आवाहन केले,

"आजचे संमेलन बँक ऑफ महाराष्ट्रच्या 89 व्या स्थापना दिनाचे अत्यंत अभिमानाने आणि कृतज्ञतेने स्मरण करत आहे. छोट्याशा सुरुवातीपासून ते सध्याच्या स्थितीपर्यंतचा प्रवास हा बँकेच्या समर्पण आणि बांधिलकीचा पुरावा आहे. जलद डिजिटल परिवर्तनाच्या या युगात ग्राहक आणि कर्मचाऱ्यांसह सर्व हितसंबंधीयासाठी व्यवसाय सुलभतेवर लक्ष केंद्रित करून प्रक्रिया आणि तंत्रज्ञानातील नवकल्पना यांचे लवकरात लवकर व्यावसायिक संधीत रुपांतर करणे यास सर्वोच्च प्राधान्य आहे. डिजिटल अंतरनिरासानासह दर्जेदार सानुकूलित उत्पादने आणि सेवा ही नवीन युगाचा मूलमंत्र आणि ग्राहकांचा श्वास आहे. बँक विविध अत्याधुनिक बँकिंग योजना आणि सेवा सादरकरून व्यवसाय करणे अधिक सुलभ करण्यासाठी डिजिटल माध्यमांवर अधिक भर देत आहे. असा अभिप्राय कार्यकारी संचालक श्री आशीष पांडे यांनी व्यक्त केला.

श्री पांडे यांनी डिजिटल वाढ आणि नवोपक्रमासाठी असलेली बँकेची अतूट वचनबद्धता अधोरेखित केली व ग्राहकांना जागतिक दर्जाचे बँकिंग अनुभव देण्यासाठी मनुष्यबळ , प्रक्रिया आणि तंत्रज्ञानामध्ये अतिरिक्त गुंतवणूक करण्याचे आश्वासन दिले. या प्रयत्नामध्ये पर्यावरणीय, सामाजिक आणि प्रशासन (ESG) घटकांचे महत्त्व अधोरेखीत करून बँक सेवा देत असलेल्या ग्राहकांच्या आणि समुदायांच्या आर्थिक कल्याण व लाभतील बँकेचे एक विश्वासार्ह भागीदार म्हणून असलेले स्थान त्यांनी अधोरेखित केले.

व्यवसायात अधिकाधिक पर्यावरण पूरक आणि हवामाना प्रती लवचिक संक्रमणाला पाठबळ देण्यासाठी आपल्या व्यवसायात आणि निर्णय प्रक्रियेमध्ये हवामान बदला विषयक चिंता समाकलित करण्यासाठी बँक कटिबद्ध आहे. हवामान विषयक धोके कमी करण्यासाठी बँकेने गृहनिर्माण आणि वाहन कर्जासाठी हरित वित्तपुरवठा योजना , हरित ऊर्जा साधने व उपाय अवलंब करणे आणि वृक्ष लागवडीचे महत्त्वपूर्ण प्रयत्न यांचा समावेश असलेले अंतर्गत नियंत्रण उपाय आणि हवामान जोखीम व्यवस्थापन धोरणे लागू केली आहेत. या व्यतिरिक्त, ई-कचरा विल्हेवाट, L E D आणि ऊर्जा-कार्यक्षम वातानुकुलीत यंत्रांचा वापर, एकल- वापर प्लास्टिक बंद करणे आणि कागदाची बचत करणारे " ई-मीटिंग " सारखे अनुप्रयोग वापरणे यासारख्या अनेक पर्यावरणपूरक पद्धतींमध्ये बँक सक्रियपणे गुंतलेली आहे. शिवाय, बँकेने कर्ज देण्याच्या निर्णयांमध्ये ESG (पर्यावरण, सामाजिक आणि प्रशासन) गुणांकनाचा स्वीकार केला आहे आणि त्यांच्या कार्बन उत्सर्जनावरील प्रभावाचे सक्रियपणे मूल्यांकन करत आहे. अलीकडेच बँकेने 8850 किलो ई-कचऱ्याचे जबाबदारीने व्यवस्थापन केल्याच्या परिणामी कार्बन उत्सर्जनात 12,000 किलोग्रॅमची प्रशंसनीय घट झाली आहे.

सामाजिक आघाडीवर, विविध विमा पर्यायांद्वारे बँक ग्राहकांच्या हिताचे रक्षण करते आणि ग्राहक आणि कर्मचारी दोघांसाठी मजबूत तक्रार निवारण यंत्रणा स्थापित केली आहे. सर्वसमावेशकता आणि न्याय्य विकासाला चालना देण्यासाठी, बँक उपेक्षित आणि असुरक्षित गटांना प्राधान्य व पाठबळ देणारे प्रापण धोरण अवलंबते. छळ आणि व्हिसलब्लोअरच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी बँकेने तक्रार कक्ष आणि समित्यांसह समर्पित अंतर्गत यंत्रणा स्थापित करून मानवी हक्कांना प्राधान्य दिले जाते.

प्रशासनाच्या दृष्टीने, बँक न्याय्य बँकिंग प्रणाली अवलंबण्यासाठी कटिबद्ध असून भ्रष्टाचार आणि लाचखोरी रोखण्यासाठी धोरणे स्थापित केली आहेत. व्यवसायिक उत्तरदायित्व आणि शाश्वतता अहवालाच्या (BRSR) माध्यमातून वार्षिक प्रकटीकरणासाठी भारतीय प्रतिभूती विनिमय मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे देखील बँक पालन करत असून सदर अहवाल बँकेच्या अधिकृत वेबसाइटवर सहज उपलब्ध आहे. यातून बँकेची व्यावसायिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाची बांधिलकी दिसून येते

ग्राहक आणि कर्मचारी दोघांसाठी बँकिंग व्यवहार सुलभ करण्याच्या आणि अधिक सोयीस्कर बनवण्याच्या आपल्या ध्येयाचा पाठपुरावा करण्यासाठी, बँक ऑफ महाराष्ट्रने आपल्या स्थापना दिन सप्ताहात (11-16 सप्टेंबर) तंत्रज्ञान चालित 75 हून अधिक सेवा, उत्पादने आणि उपयुक्तता सादर केल्या आहेत. एकूण ग्राहक अनुभव सुधारणे आणि ग्राहकांच्या सोयीनुसार बँकिंग अधिक सुलभ बनवणे हाच या नवकल्पनांचा स्वीकार करण्याचा उद्देश आहे.

बँकेने देऊ केलेल्या व्हॉट्सॲप बँकिंग सेवेत अनेक सुधारणांचा समावेश करून आपल्या सेवांना एक नवीन आयाम दिला आहे. या सुधारणांमध्ये व्हॉट्सॲप बँकिंग वापरून डेबिट कार्ड मर्यादा अद्ययावत करणे, निगमिय ग्राहकांसाठी बिल फायनान्स सुविधा सुरु केल्यामुळे त्यांना त्यांच्या व्यवसायांमध्ये आर्थिक व्यवहार सुलभपणे करणे शक्य झाले आहे. शिवाय, बँकेने व्हॉट्सॲप बँकिंग प्लॅटफॉर्मवर निर्यात वित्त समाविष्ट करण्यासाठी आपल्या सेवांचा विस्तार केला आहे, त्यामुळे आमच्या ग्राहकांना आंतरराष्ट्रीय व्यवसाय व्यवहार सहजतेने करता येतील. व्हॉट्सॲप बँकिंग वापरून, ग्राहक क्रेडिट कार्ड तसेच डेबिट कार्ड परिचालनावर अधिक नियंत्रण ठेवू शकतात ; यामध्ये क्रेडिट कार्डाचे हॉट-लिस्टिंग करून वापर थांबविणे, तसेच क्रेडिट कार्ड मर्यादा पुनरावलोकन करण्याचा समावेश आहे आणि त्यामुळे ग्राहक आवश्यकतेनुसार क्रेडिट कार्ड मर्यादा कमी जास्त करू शकतात. ग्राहकांच्या पसंतीनुसार डेबिट कार्ड मर्यादेचे पुनरावलोकन देखील करता येते व WhatsApp बँकिंग माध्यमातून मुदत ठेवींच्या खात्यांतील शिल्लक रकमेची चौकशी देखील समाविष्ट आहे. कर्ज परतफेडीच्या सुलभतेसाठी ग्राहकांना कर्ज खात्यातील थकीत रकमा प्रदान जोडण्यांची सुविधा देऊन बँकेने आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. आता अनिवासी भारतीयांनाही व्हॉट्सॲप बँकिंग सेवेचा गुलदस्ता सहज उपलब्ध होऊ शकतात.

बँक ऑफ महाराष्ट्रच्या अत्याधुनिक भ्रमणध्वनी बँकिंग सेवांमध्ये आता विविध उपयोजनांचे अतिरिक्त यजमान असून उपयोगितेच्या विस्तृत श्रेणीसाठी एक खिडकी केंद्रासारखे काम करतात. भ्रमणध्वनी बँकिंग सेवा आता ग्राहकांच्या सर्व संबंधित माहितीसह सुसज्ज आहे . ग्राहक (कर्जदार / जामीनदार ) आता भ्रमणध्वनी बँकिंग सेवेद्वारे त्यांच्या कर्जाची शिल्लक पुष्टी करू शकतात. भ्रमणध्वनी बँकिंग ग्राहकांना कर्ज व्याज प्रमाणपत्र डाउनलोड करण्यासोबत शिल्लक प्रमाणपत्र डाउनलोड करता येते. त्यामुळे आता ग्राहकांनी शाखेत येण्याची गरजच संपते.

त्याशिवाय जनसुरक्षा योजनांमध्ये भर घालून आता भ्रमणध्वनी बँकिंग ग्राहकांना पंतप्रधान जीवन ज्योती बिमा योजना आणि पंतप्रधान सुरक्षा बिमा योजनांची निवड करणे देखील सुलभ करण्यात आले आहे. बँकिंग उपायोजनात आता ग्राहकांसाठी आभासी डेबिट कार्ड होस्ट सुविधा देखील उपलब्ध आहे. त्यामुळे भ्रमणध्वनी बँकिंगद्वारे नवीन डेबिट कार्डचा नवीन संकेतांक सेट करणे ग्राहकांना शक्य आहे. भ्रमणध्वनी बँकिंगच्या पॉझिटिव्ह पे प्रणालीद्वारे ₹ 50,000 किंवा त्याहून अधिक मूल्याच्या धनादेशाबाबत ग्राहकांना अगोदरच अधिसूचित करणारे वैशिष्ट्य समाविष्ट आहे .

बँकेच्या एकीकृत प्रदान अंतर्पृष्ठ ( UPI ) सेवेमध्ये आता एकीकृत प्रदान अंतर्पृष्ठ - इ रुपया या नाविन्यपूर्ण रोकड व स्पर्श विरहित सेवांच्या मंचासह विविध शासकीय कल्याणकारी सेवा आणि लाभार्थ्यांना अनुदाने यांच्या अखंड वितरणासाठी संरचित केलेल्या नवीन वैशिष्ट्यांचा समावेश आहे. आमच्या ग्राहकांना त्यांच्या संपूर्ण एकीकृत प्रदान अंतर्पृष्ठ वाटचालीत पाठबळ देण्यासाठी, बँकेने एकीकृत विवाद व समस्या निराकरण (UDIR) नावाने एक स्वयंचलित, एक खिडकी निराकरण प्रणाली देखील सादर केली आहे. यामध्ये ग्राहकांच्या एकीकृत प्रदान अंतर्पृष्ठ समस्या आणि व्यवहारांसंबंधी तक्रारींचे निराकरण करण्यासाठी प्रणाली संरचित केलेली आहे. बँकेचे एकीकृत प्रदान अंतर्पृष्ठ आता परिचालन सुलभतेसाठी साउंडबॉक्स सुविधेशी समाकलित केले आहे. बँकेने आवर्ती व्यवहारांसाठी एकीकृत प्रदान अंतर्पृष्ठ स्वयंचलित प्रदान ही स्थायी सूचना सदृश प्रणाली सुरु केली असून यामुळे ग्राहक आणि सेवा प्रदाते दोघांसाठी प्रदान प्रक्रिया सुलभ होईल.

आजच्या या स्थापना दिनानिमित्त बँकेने आपल्या बँक हमी / पतपत्र सेवाचा लाभ घेणाऱ्या ग्राहकांसाठी वटणावळीच्या हिशेबासाठी एक सुव्यवस्थित प्रक्रिया देखील सुरू केली आहे. यामुळे वटणावळीचे परिगणन करण्यातील मानवी हस्तक्षेप पूर्णपणे थांबून व्यवहार त्रुटी-मुक्त अधिक कार्यक्षमतेने होतील व सर्व प्रक्रिया सुलभ होईल. बँकेने जुन्या धनाकर्षच्या पुनर्प्रमाणीकरणाची प्रक्रिया देखील सुविहित केली आहे त्यामुळे आमच्या ग्राहकांना अधिक कार्यक्षम आणि सोयीस्कर अनुभव येऊन पुनर्प्रमाणीकरण प्रक्रिया जलद होईल.

आतापर्यंत कधीच कर्ज न घेतलेल्या किंवा आपल्या कर्ज विषयक भूतकाळाची पुनर्बांधणी करू इच्छिणाऱ्या ग्राहकांसह कर्जांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी बँकेने ठेवींवर आधारित क्रेडिट कार्ड आणले आहे. बँकेने आपल्या इंटरनेट बँकिंगद्वारे आणि इतर विविध एकीकृत प्रदान अंतर्पृष्ठ मंचा द्वारे क्रेडिट कार्ड प्रदान स्वीकारण्यास देखील सुरूवात केली आहे. हे बँकेच्या ग्राहकांसाठी देखील सोयीस्कर आहे.

बँकेची इंटरनेट आधारित सेवा (IB) एका नव्या स्वरुपात सादर करण्यात आली आहे. इंटरनेट बँकिंग सुविधा ही उपयोगकर्त्यांना सानुकुलीत करण्यात आली आहे. इंटरनेट आधारित सेवांमध्ये आता ग्राहकांना त्यांच्या ग्राहक माहिती आवेदन क्रमांक – CIF आधारित ग्राहकांच्या (बचत / चालू / मुदतठेव / कर्ज) सर्व खात्यांची माहिती व विवरण एकाच ठिकाणी मिळेल तसेच ग्राहकांना (कर्जदार / जामीनदार) त्यांच्या कर्जाची शिल्लक पुष्टी देखील करता येईल. आता ग्राहकांचे भविष्य निर्वाह निधी खाते देखील इंटरनेट

बँकिंग सक्षम केले आहे आणि पात्र ग्राहकांसाठी आपला ग्राहक ओळख पुनर्स्थापित ( री-केवायसी ) सुविधा देखील उपलब्ध आहे.

बँकेच्या विविध प्रकारच्या ठेवी आणि कर्ज योजनांमुळे ग्राहकांच्या अनन्य गरजा समजून घेणारा आर्थिक जोडीदार म्हणून तिची स्थिती आणखी मजबूत होईल. या योजना व्यक्तींना सक्षम करण्यासाठी, व्यवसायांना पाठबळ देण्यासाठी आणि आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी संरचित केल्या आहेत. यामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी वरिष्ठ उन्नती बचत योजना, सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी बचत खाते ही सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी तयार केलेली बचत योजना, सशस्त्र दल आणि पोलीस कर्मचारी यासारख्या सशस्त्र कर्मचाऱ्यांना समर्पित असलेली विशेष बचत योजना महा-कीर्ती यांचा समावेश आहे

बँकेने महिला उन्नती योजना देखील सुरु केली असून महिलांना आर्थिक विकास साधण्यासाठी सक्षम करण्यासाठी तिची संरचना केलेली आहे. त्यामध्ये अमूलचे प्रतिनिधी वितरक आणि भागीदारांसाठी एक विशेष योजना आणि महा कृषी-यंत्रसामग्री भाड्याने देण्याची योजना समाविष्ट आहे, ज्याचा उद्देश लहान आणि सीमांत शेतकऱ्यांना वैयक्तिक मालकी खर्चाच्या बोझ्याशिवाय शेती यंत्रसामग्री आणि उपकरणे तसेच अन्य विविध सुविधांमध्ये अभिगम मिळवून देण्यासाठी साहाय्य देणारी योजना सुरु केली आहे.

या महत्त्वपूर्ण प्रसंगाच्या निमित्ताने बँकेने "पुनरुज्जीवन पुनर्शोध, व धाव : बँक ऑफ महाराष्ट्रचा परिवर्तनाचा प्रवास" या आपल्याच प्रवासाचा एक प्रकरण म्हणून अभ्यास सुरू केला आहे. सन 2017 मध्ये प्रतिबंधात्मक निरीक्षण प्रक्रियेत समाविष्ट होण्यापासून ते खूप मोठे, मजबूत आणि जलद उदयास येण्यासाठी आणि व्यवसाय वाढीच्या दृष्टीने सर्वोत्तम कामगिरी करणारी सार्वजनि बँकिंग क्षेत्रातील आघाडीची बँक म्हणून बँकेने घेतलेल्या वेगवेगळ्या वळणांच्या प्रेरणादायी प्रवासाचे वर्णन यामध्ये केले आहे. बँक ऑफ महाराष्ट्रचा हा प्रकरण अभ्यास पुनर्रचना आणि पारदर्शक नेतृत्वाद्वारे स्वतःचा पुनर्शोध घेऊ इच्छिणाऱ्या सर्व संस्थांसाठी एक वास्तुपाठ आहे. हा उल्लेखनीय उलटफेर प्रकरण अभ्यास हा वित्तीय सेवा संस्थांना पुनरुज्जीवित करण्यासाठी एक प्रारूप म्हणून समोर ठेवता येईल.

ग्राहक सेवेत निरंतर उत्कृष्टतेची प्रेरणा देणाऱ्या उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आणि बँकेच्या सन्माननीय ग्राहकांना बँकिंग मधील अत्याधुनिक सेवा देऊ करण्यासाठी समर्पणाने झटणाऱ्या कर्मचाऱ्यांना या कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.

बँक ऑफ महाराष्ट्रची पारदर्शकता, ग्राहक-केंद्रितता आणि जबाबदार बँकिंगची बांधिलकी त्यांच्या पुढील वाटचालीत मार्गदर्शन करत राहील. बँक स्वतःला केवळ आर्थिक सेवा प्रदान करणारी कंपनी म्हणून पाहत नाही तर तिच्या ग्राहकांच्या आणि ती सेवा देत असलेल्या समुदायांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणारा एक उत्प्रेरक म्हणून पाहते.

अंतिमतः बँक ऑफ महाराष्ट्रचा ८९ वा स्थापना दिन सोहळा हा केवळ भूतकाळाचे प्रतिबिंब नसून भविष्याकडे पाहण्याची दूरदृष्टी देणारा होता. बँक ही आपल्या ग्राहकांच्या आर्थिक कल्याणासाठी एक विश्वासू जोडीदार

आणि सर्वांसाठी आशा आणि संधीचा किरण आहे हे बँकेची शाश्वत मूल्ये, काळजी घेतील. पुढच्या प्रवासाला सुरुवात करत असताना, जिथे बँकिंग प्रगती, समृद्धी आणि सकारात्मक बदल समानार्थी आहेत असे एक भविष्य घडवण्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्र वचनबद्ध आहे.

---




(डावीकडून उजवीकडे) श्री ए बी विजयकुमार, कार्यकारी संचालक, श्री ए एस राजीव, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आणि श्री आशीष पांडे, कार्यकारी संचालक, बँक ऑफ महाराष्ट्र